# स्वर्गातून आलेली जीवंत भाकर



कार्लोस ए. हेमनडॅझ
एड्रियन एबन्स

# स्वर्गातून आलेली जिवंत भाकर

## कार्लोस ए. हर्नांडेझ आणि एड्रियन एबेन्स

Printed by

MARANATHA
MEDIA

maranathamedia.com

**November, 2025**

पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई कृतिका निकाळजे ह्यांनी मदत केली आहे.

पांच हजार लोकांना जेवू घालण्याच्या प्रसंगातून ख्रिस्ताचे जीवन आपल्याला कसे पोसते याचे एक अद्भुत उदाहरण आपल्याला दिसते. हा चमत्कार वलांडणाच्या उत्सवाच्या अगदी आधी घडला.

योहान ६:४-५ “यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ आला होता. 5तेव्हा येशू दृष्टी वर करून व आपणाकडे मोठा लोकसमुदाय येत आहे असे पाहून फिलिप्पाला म्हणाला, “ह्यांना खायला आपण भाकरी कोठून विकत आणाव्यात?"

बेखमी भाकरीचा उत्सव सुरू होणार असल्याने, इस्राएली समाजात भाकरीला असलेल्या आध्यात्मिक प्रतीकात्मक अर्थाची पुन्हा आठवण आपल्या लोकांना करून द्यावी अशी येशूची इच्छा होती काय? तो पाच भाकऱ्या आणि दोन मासे घेतो आणि त्यांना वाढवून पाच हजार पुरुष शिवाय स्त्रिया व मुलांनाही पुरेल असे मोठे भोजन तयार करतो. लोकांनी हे चमत्कार पाहिले आणि ते विस्मयचकित झाले, आणि ते येशूचा शोध घेऊ लागले. पण दुर्दैवाने, ते ज्या भाकरीच्या शोधात होते ती आध्यात्मिक भाकरी नव्हती, तर फक्त पोट भरेल अशी भौतिक भाकरी होती.

योहान ६:२६ “येशूने त्यांना उत्तर दिले, “मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, तुम्ही चिन्हे पाहिलीत म्हणून नव्हे तर भाकरी खाऊन तृप्त झालात म्हणून माझा शोध करता.”

ही परिस्थिती येशूला लोकांना भाकरीतील समृद्ध प्रतीकात्मकता शिकवण्याची आणि लोकांना त्याच्याकडे म्हणजे आपल्या पालनकर्त्याकडे ती कशी निर्देश करते हे समजावून सांगण्याची संधी प्रदान करते.

योहान ६:२७ “नाशवंत अन्नासाठी श्रम करू नका; तर पिता जो देव ह्याने ज्याच्यावर शिक्का मारला आहे तो मनुष्याचा पुत्र तुम्हांला सार्वकालिक जीवनासाठी टिकणारे अन्न देईल त्यासाठी श्रम करा.”

येशू लोकांना फक्त भौतिक अन्नाच्या शोधापलीकडे पाहण्यास प्रोत्साहित करतो असे अन्न जे टिकत नाही आणि त्याऐवजी असे आध्यात्मिक अन्न शोधण्यास सांगतो जे अनंतकाळचे जीवन देते. असे आध्यात्मिक अन्न फक्त आपल्या प्रभु ख्रिस्त येशूकडूनच येऊ शकते. लोक येशूला स्वाभाविकपणे विचारतात की असे अन्न मिळवण्यासाठी त्यांनी कोणते कार्य करावेत. मग येशूचे उत्तर त्यांना विलक्षण वाटते:

योहान ६:२८-२९ “ह्यावरून ते त्याला म्हणाले, “देवाची कामे आमच्या हातून व्हावीत म्हणून आम्ही काय करावे?” येशूने त्यांना उत्तर दिले, “देवाचे काम हेच आहे की, ज्याला त्याने पाठवले त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा.’”

त्यांना ज्या कार्यासाठी बोलावले गेले होते ते म्हणजे जिवंत देवाचा पुत्र असलेल्या ख्रिस्तावर, देवाने तारणासाठी पाठविलेल्या मसीहावर, साध्या मनाने विश्वास ठेवणे. वचन दिलेल्या मसीहावरचा हा साधा विश्वास त्यांना येशूच्या आत्म्याने भरून काढेल आणि त्यांना अनंतकाळच्या जीवनाला घट्ट धरून राहण्यास सामर्थ्य देईल. परंतु लोक या उत्तरावर समाधानी नव्हते. त्यांना या दाव्याचा प्रत्यक्ष पुरावा हवा होता, आणि म्हणून त्यांनी येशूला आव्हान दिले:

योहान ६:३०-३१ “ह्यावरून ते त्याला म्हणाले, “असे कोणते चिन्ह आपण दाखवता की जे पाहून आम्ही आपणावर विश्वास ठेवावा? आपण कोणते कृत्य करता? आमच्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला; असे लिहिले आहे की, ‘त्याने त्यांना स्वर्गातून भाकर खाण्यास दिली.’”

येशूचा गोड, पोषक आत्मा जेव्हा मनुष्याच्या आत्म्यामध्ये कार्य करतो, ते कार्य डोळ्यांना दिसत नाही. मसीहाविषयी देवाच्या वचनावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तीच्या हृदयात हा आत्मा प्रवेश करतो. परंतु लोकांना दिसणारे चिन्ह हवे होते, आणि म्हणून त्यांनी वाळवंटात स्वर्गातून उतरलेल्या मन्नाच्या उदाहरणाचा दाखला दिला. पुन्हा एकदा येशू त्यांचे लक्ष मन्नाच्या चमत्कारामागे दडलेल्या आध्यात्मिक सत्याकडे वेधतो.

योहान ६:३२-३३ “ह्यावरून येशू त्यांना म्हणाला, “मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, मोशेने तुम्हांला स्वर्गातून येणारी भाकर दिली असे नाही; तर माझा पिता स्वर्गातून येणारी खरी भाकर तुम्हांला देतो. कारण जो स्वर्गातून उतरतो व जगाला जीवन देतो तोच देवाची भाकर होय.”

येशू दैवी नमुन्याचे खोल सत्य स्पष्ट करीत होता. वरून येणारी अदृश्य खरी भाकरी तीच मन्नाच्या रूपाने दिसत होती. जर त्यांनी त्या चिन्हाचा अर्थ ओळखला असता, तर त्यांचे लक्ष थेट ख्रिस्ताकडे गेले असते. आणि मग त्यांना समजले असते की वाळवंटात मन्ना पडत होता याचे एकमेव कारण हेच की ख्रिस्त स्वतःची जीवनशक्ती देत होता, ज्यामुळे ते अन्न त्यांना मिळू शकत होते.

येशू हाच धडा सहाव्या अध्यायाच्या उर्वरित भागात पुन्हा पुन्हा खोलपणे शिकवतो. या शब्दांकडे नीट लक्ष द्या:

योहान ६:४८-५१ “मीच जीवनाची भाकर आहे. तुमच्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला तरी ते मेले. स्वर्गातून उतरणारी भाकर अशी आहे की ती जर कोणी खाल्ली तर तो मरणार नाही. स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर मीच आहे; ह्या भाकरीतून जो कोणी खाईल तो सर्वकाळ जगेल; जी भाकर मी देईन ती माझा देह असून ती जगाच्या जीवनासाठी आहे.”

सर्व जीवन ख्रिस्ताकडूनच येते, आणि आता येशू हे जीवन आपल्यापर्यंत कसे येते हे प्रकट करीत आहे.

योहान ६:५१ “…जी भाकर मी देईन ती माझा देह असून ती जगाच्या जीवनासाठी आहे.”

येशू हे पुढे अधिक स्पष्ट करतो:

योहान ६:५३–५५ “ह्यावरून येशू त्यांना म्हणाला, “मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, तुम्ही मनुष्याच्या पुत्राचा देह खाल्ला नाही व त्याचे रक्त प्याला नाही तर तुमच्यामध्ये जीवन नाही; जो माझा देह खातो व माझे रक्त पितो, त्याला

सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि मीच त्याला शेवटल्या दिवशी उठवीन. कारण माझा देह खरे खाद्य व माझे रक्त खरे पेय आहे."

ख्रिस्त आपल्याला हे जीवन देऊ शकतो यासाठी एकच मार्ग आहे म्हणजे त्याने दु:ख भोगणे आणि मृत्यू पत्करणे. खालील विधानांमध्ये दिलेल्या ख्रिस्त व त्याच्या सृष्टीतील नात्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करा:

आपल्या प्रभुने असे म्हटले आहे: "तुम्ही मनुष्याच्या पुत्राचा देह खाल्ला नाही व त्याचे रक्त प्याला नाही तर तुमच्यामध्ये जीवन नाही; जो माझा देह खातो व माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि मीच त्याला शेवटल्या दिवशी उठवीन. कारण माझा देह खरे खाद्य व माझे रक्त खरे पेय आहे." योहान ६:५३–५५ हे आपल्या शारीरिक प्रकृतीबद्दल तितकेच सत्य आहे. ख्रिस्ताच्या मृत्यूचे ऋणी आपण या पृथ्वीवरील जीवनासाठीही आहोत. आपण जी भाकर खातो ती त्याच्या तुटलेल्या देहाच्या किंमतीवर आपल्यापर्यंत आली आहे. आपण जे पाणी पितो ते त्याच्या सांडलेल्या रक्ताने विकत घेतलेले आहे. एकही मनुष्य पवित्र असो वा पापी आपला दररोजचा आहार खातो, पण त्याचे पोषण ख्रिस्ताच्या देह आणि रक्तानेच होत असते. कालवरीवरील क्रूस प्रत्येक भाकरीवर कोरला आहे. तो प्रत्येक झऱ्याच्या पाण्यात प्रतिबिंबित होतो. आपल्या महान बलिदानाच्या चिन्हांची नियुक्ती करून ख्रिस्ताने हे सर्व शिकविले आहे. वरच्या खोलीत झालेल्या त्या प्रीती भोजनाच्या सेवेमधून येणारा प्रकाश आपल्या दैनंदिन जीवनातील अन्न-पाण्याला पवित्र करतो. घरातील भोजनमेज प्रभूच्या मेजासारखी होते, आणि प्रत्येक भोजन हे जणू एक धार्मिक विधी ठरते. युगायुगाची आशा, पृ. ६६०.३

"तो केवळ सर्वांचा निर्माणकर्ता नाही, तर तो जे काही जिवंत आहे त्यांचे जीवनही तोच आहे. सूर्यप्रकाशात, निर्मळ गोड हवेत, आणि आपल्या शरीरास बांधणाऱ्या व आपली शक्ती टिकवून ठेवणाऱ्या अन्नात आपण त्याच्याकडूनच जीवन ग्रहण करतो." एज्युकेशन, पृ. १९८

संपूर्ण भौतिक जीवन ख्रिस्ताच्या अनंत जीवनावर आधारलेले आहे. आपण जे प्रत्येक अन्नाचे कण खातो ते ख्रिस्ताच्या रक्ताच्या खरेदीतूनच आपल्यापर्यंत

येते. सूर्य, पाऊस आणि जमीन आपल्या पिकांच्या बियांचे संगोपन करणारी ही सर्व शक्ती क्रूसावरील ख्रिस्ताच्या सामर्थ्यानेच आपल्याला दिली जाते. हे आपल्याला एका अत्यंत महत्त्वाच्या सत्याकडे घेऊन जाते.

आपण जे अन्न खातो त्यामध्ये स्वतः आपल्याला जिवंत ठेवण्याची शक्ती नसते. उलट आपण जे अन्न खातो ते आपल्यापर्यंत ख्रिस्ताची शक्ती पोहोचविण्याचे एक माध्यम असते. क्रूसावरील ख्रिस्ताच्या महान बलिदानामुळे ही शक्ती त्या अन्नामार्फत आपल्यापर्यंत पोहोचू शकते. म्हणून आपण जी भाकर खातो तिचा विचार करतो तेव्हा ही भौतिक भाकरच आपल्याला जिवंत ठेवते असे नाही; तर स्वर्गातून उतरलेली खरी भाकर, म्हणजे ख्रिस्तच, आपल्याला जीवन देतो.

सर्व निर्माण केलेल्या वस्तूंवर देवत्वाची मुद्रा दिसून येते. निसर्ग देवाविषयी साक्ष देतो. विश्वातील चमत्कार व गूढतेच्या संपर्कात येणारे संवेदनशील मन त्या अनंत सामर्थ्याच्या कार्याची ओळख केल्याशिवाय राहू शकत नाही. पृथ्वी स्वतःच्या अंतर्गत ऊर्जेने आपली संपत्ती उत्पन्न करत नाही किंवा वर्षानुवर्षे सूर्याभोवती तिची गती स्वतःच्या जोरावर चालवत नाही. अदृश्य हात स्वर्गातील ग्रहांना त्यांच्या आपल्या कक्षेत मार्गदर्शन करतो. एक रहस्यमय जीवन संपूर्ण निसर्गामध्ये पसरलेले आहे ते जीवनच अनंत अवकाशात फिरणाऱ्या असंख्य जगांना आधार देते; तेच उन्हाळ्याच्या मंद झुळुकीत तरंगणाऱ्या किटक-परमाणूत वास करते; तेच सुरईच्या उड्डाणाला पंख देते आणि आक्रोश करणाऱ्या तरुण कावळ्यांना आहार देते; तेच कळीला फुलात व फुलाला फळात रूपांतरित करते.

निसर्गाला जपणारी हीच शक्ती मनुष्यामध्येही कार्यरत आहे. ज्याच्याने तारा आणि परमाणू दोघांनाही मार्गदर्शन केले जाते, त्या महान नियमांनीच मानवी जीवन नियंत्रित केले जाते. हृदयाच्या क्रियेचे जे नियम शरीरात जीवनस्रोत वाहत ठेवतात, ते त्या महान बुद्धिमत्तेचे नियम आहेत ज्याच्या अधिकाराखाली मानवी आत्मा आहे. सर्व जीवन त्याच्याकडूनच येते. फक्त त्याच्याशी सुसंगतीत राहिल्यावरच जीवनाचा खरा आविष्कार प्राप्त होऊ शकतो.

एज्युकेशन, पृ. ९९

हे स्पष्ट करण्यासाठी: ख्रिस्त स्वतः भाकर नाही, तसेच तो भाकरीमध्येही नाही. भाकर ही फक्त त्याचे जीवन आपल्यापर्यंत पोहोचविण्याचे माध्यम आहे. ख्रिस्त हा स्त्रोत असून भाकर हे माध्यम आहे. हे दोन्ही घटक वेगळे आणि स्वतंत्र असले तरी त्यातील एक घटक दुसऱ्याच्या द्वारे प्राप्त होतो. भविष्यवाणीच्या आत्म्याच्या लेखणीतून ही भिन्नता पुढीलप्रमाणे अगदी स्पष्ट केली आहे:

देवाच्या निसर्गातील कृतीमुळे निसर्गामध्ये देव स्वतः आहे असे होत नाही. निसर्गातील गोष्टी या देवाच्या स्वभावाची अभिव्यक्ती आहेत; त्यांच्यामार्फत आपण देवाचे प्रेम, सामर्थ्य आणि तेज समजू शकतो; परंतु निसर्गालाच देव मानायचे नाही. मानवाच्या कलात्मक कौशल्याने अत्यंत सुंदर निर्मिती होऊ शकते, जे डोळ्यांना आनंद देतात, आणि त्या वस्तू निर्मात्याच्या कल्पनेची एक झलक दाखवतात; पण तयार केलेली वस्तू हा मनुष्य स्वतः नसतो. मान-सन्मान मिळण्यास पात्र वस्तू नव्हे तर वस्तू घडवणारा कलाकार असतो. त्याचप्रमाणे, निसर्ग हा देवाच्या विचारांची अभिव्यक्ती आहे, परंतु गौरव करावयाचा निसर्ग नव्हे, तर निसर्गाचा देव आहे. टेस्टिमोनीज, खंड ८, पृ. २६३

दररोज सकाळी व संध्याकाळी एक कोकरू अर्पण केले जात असे. या कोकऱ्याबरोबर एक एफाचा दहावा भाग पीठ आणि एक हिंचा चौथा भाग, तेल अर्पण केले जात असे. काही स्रोत सांगतात की एक एफा सुमारे ३५ लिटर[1] असते, तर काही म्हणतात की ते सुमारे २२ लिटर[2] असते. या पुस्तिकेमध्ये आपण २२ लिटरचे मोजमाप वापरणार आहोत, कारण आपला मुख्य हेतू हे प्रमाण समजावून देणे हा आहे. लिटर हे घनफळमध्ये मोजतात, तर किलो हे वजन मोजतात. एक लिटर संपूर्ण गव्हाचे पीठ साधारण ०.६५ किलो वजनाचे असते. एक हिं सुमारे एक गॅलन म्हणजे ३.६ लिटर[3] असते. त्याचा चौथा भाग म्हणजे

[1] http://www.dictionary.com/browse/ephah ; http://www.thefreedictionary.com/ephah

[2] http://www.convert-me.com/en/convert/history_volume/bibephah.html http://bibleresources.americanbible.org/resource/weights-and-measures-in-ancient-israel https://en.wikipedia.org/wiki/Ephah

[3] http://bibleresources.americanbible.org/resource/weights-and-measures-in-ancient-israel

०.९ लिटर. त्या अनुषंगाने, प्रत्येक दैनंदिन अर्पणामध्ये साधारण: १.४ किलो पीठ आणि ०.९ लिटर तेल एकत्र मिसळून अर्पण केले जात असे. हे जर आपण तक्त्याच्या स्वरूपात मांडले, तर असे दिसते:

| अर्पण | प्राणी | अर्पणासाठी लागणारे एकूण पीठ | अर्पणासाठी लागणारे एकूण तेल |
|---|---|---|---|
| दैनंदिन अर्पण | सकाळी एक कोकरू आणि संध्याकाळी एक कोकरू — एकूण २ कोकरे | १.४ किलो पीठ × २ (सकाळ व संध्याकाळ) एकूण = २.८ किलो | ०.९ लिटर तेल × २ (सकाळ व संध्याकाळ) एकूण = १.८ लिटर |

पीठ आणि तेल यांचे मिश्रण असलेला एक मूठभर अंश धूप तेलाबरोबर बलिदानाच्या वेदीवर जाळले जात असे, आणि उरलेले पीठ व तेल याजकवर्गास दिले जात असे.

लेवीय २:१-३ कोणाला परमेश्वराप्रीत्यर्थ अन्नार्पण करायचे असल्यास त्याने सपीठ अर्पावे; त्याच्यावर त्याने तेल ओतून वरती धूप ठेवावा. मग त्याने ते अहरोनाचे मुलगे जे याजक त्याच्याकडे आणावे; त्यातून मूठभर सपीठ, तेल व सगळा धूप घेऊन याजकाने स्मारकभाग म्हणून वेदीवर त्याचा होम करावा. हे परमेश्वराप्रीत्यर्थ सुवासिक हव्य होय. अन्नार्पणातून जे काही उरेल ते अहरोनाचे व त्याच्या मुलांचे. हा उरलेला भाग परमेश्वराला अर्पायची जी हव्ये आहेत त्यांतला परमपवित्र होय.

लेवीय १०:१२-१४ मग मोशेने अहरोनाला व त्याचे राहिलेले मुलगे एलाजार व इथामार ह्यांना सांगितले की, “परमेश्वराच्या हव्यांपैकी उरलेले अन्नार्पण घेऊन वेदीजवळ खमिरावाचून खा, कारण ते परमपवित्र आहे; ते तुम्ही पवित्र स्थळी खावे, कारण परमेश्वराच्या हव्यांपैकी तो तुझा हक्क व तुझ्या मुलांचा हक्क आहे; मला अशीच आज्ञा झाली आहे. ओवाळलेला ऊर आणि समर्पित केलेली मांडी ही तुम्ही, म्हणजे तू व तुझ्यासहित तुझे मुलगे व मुली ह्यांनी एखाद्या स्वच्छ स्थळी खावी; कारण इस्राएल लोकांनी केलेल्या शांत्यर्पणाच्या यज्ञांपैकी तुला व तुझ्या मुलाबाळांना ती हक्क म्हणून दिली आहेत.

योहान ६ मध्ये ख्रिस्ताने स्वतःला जीवनाची भाकर म्हणून प्रकट केले. पीठ व तेल यांनी बनविलेली बेखमीर भाकर ही ख्रिस्तामध्ये उपलब्ध असलेल्या जीवनाकडे निर्देश करणारे एक माध्यम होते. ही खरी स्वर्गीय भाकर खाली कशी उतरली? ती जगाच्या जीवनासाठी ख्रिस्ताने आपले जीवन अर्पण केले त्या महान अर्पणाद्वारे खाली उतरली. हे दैनंदिन अर्पणामध्ये कसे ओळखले जात होते? हे कोकराच्या अर्पणाद्वारे प्रकट केले जात असे. म्हणून, कोकरू अर्पण करणे म्हणजे पवित्र आत्मा प्राप्त होण्यासाठी ख्रिस्ताने दिलेल्या जीवनाची कबुली देणे होय. हे सत्य पीठ आणि तेल यांचे मिश्रण करून तयार झालेल्या भाकरीत प्रकट झाले होते, जी याजकांना खाण्यासाठी ठेवली जात असे. आणि याजकांनी मग इस्राएलामधील इतरांवर कृपेचे सेवक म्हणून कार्य करायचे होते. आज, ख्रिस्तावर विश्वास ठेवणारे सर्व जण राजकीय याजकवर्गाचा भाग आहेत, आणि ते सर्व या जिवंत भाकरीचा आस्वाद घेऊ शकतात.

१ पेत्र २:९ “पण तुम्ही तर ‘निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र,’ देवाचे ‘स्वत:चे लोक’ असे आहात; ह्यासाठी की, ज्याने तुम्हांला अंधकारातून काढून आपल्या अद्भुत प्रकाशात पाचारण केले ‘त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावेत.’”

हे प्रभूच्या प्रार्थनेला नवे अर्थ प्रदान करते काय? हा मुद्दा लक्षात घ्या:

मत्तय ६:११ “आमची रोजची भाकर आज आम्हांला दे;”

प्रत्येक सकाळी आणि प्रत्येक संध्याकाळी, दैनंदिन बलिदानात अर्पण केलेल्या भाकरींनी स्वर्गातून उतरणाऱ्या खऱ्या जीवनभाकरीचे प्रतिक दर्शवले होते; आणि ख्रिस्ताचे हे जीवन देण्याचे सामर्थ्य सतत असल्याचे प्रतीक दररोज होणाऱ्या कोकराच्या मृत्यूमधून दाखवले गेले होते. आपण जेव्हा प्रार्थना करतो, “आमची रोजची भाकर आज आम्हास दे!” तेव्हा आपण स्वर्गातून खाली उतरणाऱ्या देवाच्या खऱ्या भाकरीबद्दल विचार करतो का, की फक्त भौतिक भाकरीबद्दल?

इस्राएली लोकांना जगणे, श्वास घेणे, खाणे आणि पिणे याचीही क्षमता स्वर्गातून उतरलेल्या त्या खऱ्या भाकरीमुळेच होती. आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे शब्बाथाच्या दिवशी अर्पणांमध्ये काय बदल होतो हे पाहणे.

गणना २८:९-१० “दर शब्बाथ दिवशी एकेक वर्षाची दोन दोषहीन नरजातीची कोकरे आणि अन्नार्पणासाठी तेलात मळलेले दोन दशमांश एफा सपीठ व त्याबरोबरचे पेयार्पण ही अर्पावीत. नित्य होमार्पण व त्याबरोबरचे पेयार्पण ह्यांखेरीज आणखी हा होमबली दर शब्बाथ दिवशी अर्पावा.”

शब्बाथाच्या दिवशी होमार्पण आणि अन्न अर्पण दुप्पट केले जात होते.

| अर्पणाचा प्रकार | प्राण्यांची संख्या | एकूण पीठ | एकूण तेल |
|---|---|---|---|
| दैनिक अर्पण (सकाळी एक कोकरू + संध्याकाळी एक कोकरू) | २ कोकरू एकूण = २ कोकरू | १.४ कि.ग्रा. × २ एकूण = २.८ कि.ग्रा. | ०.९ लि. × २ एकूण = १.८ लि. |
| शब्बाथ अर्पण (शब्बाथचे २ कोकरू + दैनिक अर्पणातील २ कोकरू) | एकूण = ४ कोकरू | २.८ कि.ग्रा. (शब्बाथ) + २.८ कि.ग्रा. (दैनिक) एकूण = ५.६ कि.ग्रा. | १.८ लि. (शब्बाथ) + १.८ लि. (दैनिक) एकूण = ३.६ लि. |

इथे अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारला पाहिजे: शब्बाथाच्या दिवशी सर्वकाही दुप्पट का केले जाते? आपण पुन्हा आठवतो की प्रत्येक भाकर आणि प्रत्येक थेंब तेल हा ख्रिस्ताच्या जीवनाचा प्रवाह आपल्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे. दिसणारे व खाल्ले जाणारे अन्न आणि पेय हे स्वर्गातून पृथ्वीवर ख्रिस्ताद्वारे येणाऱ्या आध्यात्मिक अन्नाचे व पेयाचे प्रतिक होते. पौल हे अशा रीतीने सांगतो:

१ करिंथ १०:१-४ "बंधुजनहो, आपले पूर्वज सर्वच मेघाखाली होते आणि समुद्रातून ते सर्व पार गेले; मेघ व समुद्र ह्यांच्या द्वारे मोशेमध्ये त्या सर्वांचा बाप्तिस्मा झाला; त्या सर्वांनी एकाच प्रकारचे आध्यात्मिक अन्न सेवन केले; आणि ते सर्व तेच आध्यात्मिक पाणी प्याले. कारण ते आपल्यामागे चालणाऱ्या आध्यात्मिक खडकातून पीत होते; तो खडक तर ख्रिस्त होता. ह्या गोष्टींविषयी तुम्ही अजाण असावे अशी माझी इच्छा नाही."

मोशेने जेव्हा खडकावर प्रहार केला आणि त्यातून पाणी बाहेर आले, तेव्हा त्यांनी केवळ भौतिक पाण्याचा उपभोग घेतला नव्हता; ते ख्रिस्ताच्या जीवनाचा सहभाग घेत होते. पाणी स्वतःमध्ये त्यांना जिवंत ठेवू शकत नव्हते. येशूचा आत्माच त्यांना जिवंत ठेवत होता. म्हणूनच ते सर्वजण फक्त धर्मी नव्हे हे आध्यात्मिक पाणी पीत होते. आपल्याला पुन्हा आठवण दिली जाते:

मत्तय ५:४५ "अशासाठी की, तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे; कारण तो वाइटांवर व चांगल्यांवर आपला सूर्य उगववतो आणि नीतिमानांवर व अनीतिमानांवर पाऊस पाडतो."

योहान १:९ "जो खरा प्रकाश प्रत्येक मनुष्याला प्रकाशित करतो तो जगात येणार होता."

ख्रिस्ताचे जीवन, त्याने नेमलेल्या प्रवाहामधून सर्व मनुष्यांना दिले जाते. जे लोक भौतिक अन्न आणि पाण्यापलीकडे काहीही पाहत नाहीत, ते शेवटी मरण पावतील कारण ते जीवनाच्या मूळ स्रोताला मान्यता देण्यास नकार देतात. म्हणूनच येशूने आपल्या श्रोत्यांना सांगितले:

योहान ६:३२-३३ “ह्यावरून येशू त्यांना म्हणाला, “मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, मोशेने तुम्हांला स्वर्गातून येणारी भाकर दिली असे नाही; तर माझा पिता स्वर्गातून येणारी खरी भाकर तुम्हांला देतो. कारण जो स्वर्गातून उतरतो व जगाला जीवन देतो तोच देवाची भाकर होय.”

वाळवंटात पडलेला मान्ना मोशेकडून आला नव्हता. आणि मान्ना स्वतःच त्यांना जिवंत ठेवत नव्हते. मान्नाद्वारे पोहोचणारे ख्रिस्ताचे जीवन त्यांना जिवंत ठेवत होते. हीच ती खरी स्वर्गातून उतरणारी जीवनाची भाकर आहे. संपूर्ण इस्राएल आध्यात्मिक अन्न आणि आध्यात्मिक पेय खात-पीत होते, पण तरीही बहुतेक जण वाळवंटात नष्ट झाले कारण त्यांनी भौतिक अन्न-पाण्यापलीकडे पाहिलेच नाही. या विचारांच्या प्रकाशात, आता आपण पुन्हा शब्बाथ दिवशी वाढवलेल्या अतिरिक्त पिठाचे, तेलाचे आणि बलिदानांचे प्रश्नाकडे वळूया.

बायबल आपल्याला सांगते की देवाने शब्बाथाला पवित्र केले आणि तो दिवस पवित्र बनवला. ए. टी. जोन्स हे हे अगदी स्पष्टपणे समजावून सांगतात, जेव्हा ते असे म्हणतात:

आता आणखी एक मुद्दा पाहूया: निर्मितीच्या कार्यामध्ये खरा उपस्थित प्रतिनिधी कोण होता? [सभेतील उत्तर: “ख्रिस्त.”] विश्रांती कोणी घेतली? [उत्तर: “ख्रिस्त.”] कोण ताजेतवाने झाला? [उत्तर: “ख्रिस्त.”] कोणी आशीर्वाद दिला? [उत्तर: “ख्रिस्त.”] ज्याच्या उपस्थितीने दिवस पवित्र झाला, तो कोण? [उत्तर: “ख्रिस्ताची उपस्थिती.”] आजही त्या दिवशी कोणाची उपस्थिती आहे? [उत्तर: “ख्रिस्ताची.”] म्हणून, ज्याला येशू ख्रिस्ताची उपस्थिती पवित्र करीत नाही, पवित्र बनवीत नाही, आशीर्वाद देत नाही, आणि विश्रांती देत नाही, तो मनुष्य शब्बाथ ठेवूच शकत नाही. तुम्ही पाहत नाही का की ख्रिस्त मनुष्याच्या अंतःकरणात असला तरच शब्बाथ खऱ्या अर्थाने ठेवता येतो; कारण शब्बाथ स्वतःमध्ये ख्रिस्ताची उपस्थिती घेऊन येतो. — ए. टी. जोन्स, GCB 1893, प्रवचन २०

आता ए. टी. जोन्स मांडलेला अत्यंत महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्या:

एदेनच्या बागेत, देवाने मनुष्याला जसा निर्माण केला तसा उभा असताना त्या वेळी मनुष्याला देवाबद्दल जितके जाणून घेता येईल ते सर्व त्याला माहिती होते का? [उत्तर: "नाही."] म्हणून, प्रत्येक शब्बाथ येई तेव्हा, त्या दिवशी त्याला देवाचे अधिक ज्ञान आणि देवाची अधिक उपस्थिती मिळत असे. पण तो कोण? [उत्तर: "ख्रिस्त."] म्हणजेच प्रत्येक शब्बाथदिवशी ख्रिस्ताबद्दलचे अधिक ज्ञान आणि ख्रिस्ताची अधिक उपस्थिती त्याच्या अंतःकरणात उतरत असे. जर मनुष्य विश्वासू राहिला असता, तर तो देवाच्या ज्ञानात म्हणजेच स्वतःच्या अनुभवात सतत वाढत राहिला असता, आणि देवाच्या स्वभावातील प्रत्येक गुणामध्ये अधिकाधिक वाढ मिळवत गेला असता. — ए. टी. जोन्स, GCB 1893, प्रवचन २०

म्हणूनच शब्बाथ आपल्याला ख्रिस्ताच्या उपस्थितीचा अतिरिक्त वाटा आणून देतो. याच कारणामुळे शब्बाथ आणि दैनंदिन अर्पणांमध्ये भेद दिसतो काय? शब्बाथाच्या दिवशी अर्पणे, पीठ आणि तेल सर्व काही दुप्पट असते. अधिक अर्पण म्हणजे त्या दिवशी अधिक पवित्र आत्म्याचा वरदान दिला जातो असे दर्शवत नाही काय? येथे परमेश्वराचे वचन आहे:

यशया ५८:१३-१४ "तू शब्बाथाची पायमल्ली करणार नाहीस, माझ्या पवित्र दिवशी आपला उद्योगधंदा करणार नाहीस, शब्बाथ आनंददिन आहे, परमेश्वराचा पवित्र व सन्मान्य दिन आहे असे म्हणून त्याचा आदर करशील; व त्या दिवशी आपले कामकाज करणार नाहीस, आपला धंदा चालवणार नाहीस, वायफळ गोष्टी बोलत बसणार नाहीस; तर तू परमेश्वराच्या ठायी हर्ष पावशील; तू देशाच्या उच्च स्थलांचे जयोत्साहाने आक्रमण करशील, असे मी करीन; आणि तुझा पिता याकोब ह्याच्या वतनाचा तुला उपभोग घेऊ देईन; परमेश्वराच्या तोंडचे हे शब्द आहेत."

शब्बाथामध्ये अधिक आशीर्वाद आहेत, आणि हे आशीर्वाद म्हणजे ख्रिस्ताच्या आत्म्याचा अधिक वाटा आहे हे जाणणे, शब्बाथ आपल्याला शिकवतो की देवाने अशी काही विशिष्ट वेळ नेमून ठेवल्या आहेत ज्यांत येशूची उपस्थिती इतर वेळेपेक्षा आपल्याजवळ अधिक येते. याची साक्ष यशयाच्या या वचनातून मिळते:

यशया ४८:१८ "तू माझ्या आज्ञा लक्षपूर्वक ऐकतास तर बरे होते; मग तुझी शांती नदीसारखी, तुझी नीतिमत्ता समुद्राच्या लाटांसारखी झाली असती;"

ख्रिस्त आपली नीतिमत्ता आहे. यशया सांगतो की हा नीतिमत्ता समुद्राच्या लाटांसारखी आहे. लाटा एकामागून एक किनाऱ्यावर येतात उतार-चढाव घेऊन. दिवसातून साधारणपणे दोन उच्च भरती येतात. नवीनचंद्र आणि पौर्णिमेच्या वेळी "राजओहोटी" (समुद्राच्या मोठ्या लाटा) येतात. ही सर्व गोष्टी आपल्याला ख्रिस्ताच्या धार्मिक आत्म्याच्या प्रवाहाची ये-जा दाखवतात जो मनुष्यांच्या मुलांकडे येतो.

शब्बाथ समजण्याची मुख्य गुरुकिल्ली म्हणजे हे जाणणे की ख्रिस्त विशिष्ट वेळांना आपल्याजवळ विशेष रीतीने येतो. हे सत्य दैनंदिन आणि शब्बाथ अर्पणांमधील फरकात प्रतिबिंबित झाले आहे. जेव्हा आपण हे तत्त्व समजून घेतो, तेव्हा आपण एका अत्यंत सुंदर गोष्टीकडे पाहण्यास तयार होतो:

लेवीय २६:२–४ "तुम्ही माझे शब्बाथ पाळावेत आणि माझ्या पवित्रस्थानाविषयी पूज्यबुद्धी बाळगावी; मी परमेश्वर आहे. तुम्ही माझ्या विधींप्रमाणे चालाल आणि माझ्या आज्ञा पाळून त्याप्रमाणे वागाल, तर नेमलेल्या काळात तुमच्याकरता मी पाऊस पाडीन, जमीन आपला उपज देईल व मळ्यातील झाडे आपापली फळे देतील."

शब्बाथाचे स्मरण करणे म्हणजे हे लक्षात ठेवणे की परमेश्वराने विश्रांतीच्या, ताजेपणाच्या आणि आशीर्वादाच्या विशेष ऋतू नेमून दिले आहेत. पवित्रस्थानाचा आदर करणे म्हणजे हे लक्षात ठेवणे की या देणग्या आपल्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आमच्या पित्याने आणि प्रभु येशूने अतोनात किंमत मोजली आहे. जेव्हा आपण शब्बाथाचे स्मरण करतो आणि पवित्रस्थानाचा आदर करतो, तेव्हा योग्य वेळी पाऊस पडतो, भूमी फलद्रूप होते, आणि सर्व काही भरभराटीस येते.

आपण लक्षात ठेवतो की पाऊस आणि अन्न हे ख्रिस्ताचे जीवन आपल्यापर्यंत

पोहोचण्यासाठीचे मार्ग आहेत. आशीर्वाद जितके अधिक, तितके अधिक पुरावे की ख्रिस्ताचे जीवन या मार्गामधून आपल्यापर्यंत वाहत आहे. आणि जेव्हा आपण या देणग्यांसाठी कृतज्ञतेने आपले हृदय ओततो, तेव्हा आपण अधिक आशीर्वाद ग्रहण करण्यास तयार होतो.

शब्बाथच्या दिवशी आपण परमेश्वराची त्याच्या आत्म्याच्या दुप्पट वाट्यासाठी स्तुती करतो तेव्हा हा पाऊस आपल्या भोवती नव्हे तर आपल्यावर पडतो आणि आपण कृपेमध्ये वाढू लागतो. जगातील प्रत्येक मनुष्य त्याला माहिती असो वा नसो ख्रिस्ताच्या दैनंदिन अर्पणाचा लाभ घेत आहे. आपण आधी पाहिलेच की देव आपला पाऊस न्यायी आणि अन्यायी दोघांवरही पाडतो. सर्वांनाच दैनंदिन पुरवठा मिळतो; पण देवाच्या व्यवस्थेच्या बोलावणीला त्याच्या नियमाद्वारे उत्तर देणाऱ्यांनाच शब्बाथातील आणि इतर विशिष्ट नेमणुकांतील अतिरिक्त आशीर्वाद मिळतात.

शब्बाथाच्या या सत्याची अद्भुत बाब म्हणजे पवित्रस्थानातून वाहणारी नदी पुढे जसजशी जाते तशी अधिक खोल होते.

यहेज्केल ४७:१-४ मग त्याने मला मंदिराच्या द्वाराकडे परत नेले, तेव्हा पाहा, मंदिराच्या उंबरठ्याखालून पाण्याचा झरा निघून पूर्वेकडे वाहत होता; मंदिराची पुढली बाजू पूर्वेस होती; तो झरा मंदिराच्या उजव्या बाजूने वेदीच्या दक्षिणेस खालून वाहत होता. त्याने मला उत्तरद्वाराच्या वाटेने बाहेर नेले, व बाहेरच्या रस्त्याने सभोवार फिरवून बाहेरल्या द्वाराकडे म्हणजे पूर्वाभिमुख असलेल्या द्वाराकडे नेले, तेव्हा पाहा, द्वाराच्या उजव्या बाजूस पाणी वाहत होते. मग तो पुरुष पूर्व दिशेस चालला व त्याच्या हाती मापनसूत्र होते. त्याने एक हजार हात अंतर मापून मला पाण्यातून चालण्यास सांगितले, तर तेथे पाणी घोट्यापर्यंत होते. त्याने आणखी हजार हात अंतर मापून मला पाण्यातून चालण्यास सांगितले, तर तेथे पाणी गुडघ्यापर्यंत होते. त्याने आणखी हजार हात अंतर मापून मला पाण्यातून चालण्यास सांगितले, तर तेथे पाणी कंबरेपर्यंत होते.

आपण हे पाहतो की मंदिरातून पाणी बाहेर पडताच त्याची खोली वाढत गेली. ही नदी कुठे वाहते आणि कशी खोल होत जाते याचा धागा मागील अध्यायात

सापडतो.

यहेज्केल ४६:३-८,११ देशाच्या लोकांनी शब्बाथ दिवशी व चंद्रदर्शनी त्या दरवाजावरूनच परमेश्वराला दंडवत घालावे. अधिपतीने शब्बाथ दिवशी परमेश्वराला होमार्पण करायचे ते सहा निर्दोष कोकरे व एक निर्दोष एडका ह्यांचे असावे; दर एडक्यामागे एक एफा अन्नार्पण करावे व दर कोकरामागे यथाशक्ती अन्नार्पण करावे आणि प्रत्येक एफाबरोबर एक हिनभर तेल अर्पावे. चंद्रदर्शनाच्या दिवशी एक निर्दोष गोऱ्हा, सहा निर्दोष कोकरे व एक निर्दोष एडका ही अर्पण करावीत; दर गोऱ्ह्यामागे एक एफा व दर एडक्यामागे एक एफा अन्नार्पण सिद्ध करावे; दर कोकरामागे यथाशक्ती अन्नार्पण करावे, आणि प्रत्येक एफाबरोबर एक हिनभर तेल अर्पावे. अधिपतीने आत प्रवेश करताना दरवाजाच्या देवडीकडील मार्गाने यावे व त्याच मार्गाने बाहेर जावे. उत्सवांच्या व सणांच्या दिवशी दर गोऱ्ह्यामागे एक एफा अन्नार्पण व दर एडक्यामागे एक एफा अन्नार्पण करावे; दर कोकरामागे यथाशक्ती अन्नार्पण करावे, आणि दर एफाबरोबर एक हिनभर तेल अर्पावे.

अर्पणांची मात्रा दैनंदिनापासून → शब्बाथ → नवीनचंद्र → आणि नंतर उत्सवांपर्यंत क्रमवार वाढत जाते. यहेज्केल ४६ मध्ये दिलेली अर्पणांची यादी मोशेच्या पुस्तकांत दिलेल्या यादीपेक्षा थोडी वेगळी आहे. येथे आपण मोशेने दिलेला क्रम स्पष्टपणे मांडत आहोत. मी पेय अर्पणाचा समावेश केलेला नाही, परंतु त्याचाही क्रम याच पद्धतीचा आहे.

| अर्पणाचा प्रकार | प्राण्यांची संख्या | अर्पणासाठी एकूण पीठ | अर्पणासाठी एकूण तेल |
|---|---|---|---|
| १. दैनिक अर्पण — गणना | सकाळी १ कोकरू आणि संध्याकाळी १ | १.४ कि.ग्रा. पीठ × २; एकूण = २.८ कि.ग्रा. | ०.९ लिटर × २; एकूण = १.८ लिटर |

| | | | |
|---|---|---|---|
| २८:३–६ | कोकरू; एकूण = २ कोकरू | | |
| २. शब्बाथ — गणना २८:९–१० | शब्बाथाचे २ कोकरू + दैनिक बलिदानातील २ कोकरू; एकूण = ४ कोकरू | २.८ कि.ग्रा. + दैनिकाचे २.८ कि.ग्रा.; एकूण = ५.६ कि.ग्रा. | १.८ लि. + दैनिकाचे १.८ लि.; एकूण = ३.६ लि. |
| ३. नवीनचंद्र — गणना २८:११–१४ | २ तरुण बैल, १ मेंढा, ७ कोकरू + दैनिकाचे कोकरू, आणि १ पापबलीचा बकरा | (४.२ × २) = ८.४ कि.ग्रा. + (२.८ × १) = २.८ कि.ग्रा. + (१.४ × ७) + (१.४ × २) = १२.६ कि.ग्रा.; एकूण = २३.८ कि.ग्रा. | (२.७ × २) = ५.४ लि. बैलांसाठी + (१.८ × १) = १.८ लि. मेंढ्यासाठी + (०.९ × ७) = ६.३ लि. कोकरांसाठी + (०.९ × २) = १.८ लि. दैनिकासाठी; एकूण = १५.३ लि. |
| ४. वल्हांडण — निर्गम १२:२१; गणना २८:१७–२५ | वल्हांडण कोकरू, बेखमीर भाकर, कडू भाजी; ७×नवचंद्र; १४ बैल, ७ मेंढे, ४९ | (२३.८ कि.ग्रा. × ७ दिवस) + २.८ कि.ग्रा. (शब्बाथासाठी); एकूण = १६९.४ कि.ग्रा. (दैनिकाच्या | (१५.३ लि. × ७) + १.८ लि. (साप्ताहिक शब्बाथासाठी); एकूण = १०८.९ लि. |

| | | | |
|---|---|---|---|
| | कोकरू + दैनिक १४ + शब्बाथ २; ७ पापबलीचे बकरे | तुलनेत ६०.५ पट) | |
| ५. आठवड्यां चा उत्सव / पेन्तेकॉस्ट | २ बैल, १ मेंढा, ७ कोकरू + दैनिक २ कोकरू; १ पापबलीचा बकरा | (४.२ × २) + (२.८ × १) + (१.४ × ७) + (१.४ × २); एकूण = २३.८ कि.ग्रा. | (२.७ × २) + (१.८ × १) + (०.९ × ७) + (०.९ × २); एकूण = १५.३ लि. |
| ६. तुतारीचा सण — गणना २९:१–६ | नवीनचंद्रावर येतो: दैनिक + नवीनचंद्र + तुतारीचे अर्पण; ३ बैल, २ मेंढे, १६ कोकरू, २ पापबलीचे बकरे | (४.२ × ३) = १२.६ कि.ग्रा. + (२.८ + २.८) = ५.६ कि.ग्रा. + (१६ × १.४) = २२.४ कि.ग्रा.; एकूण = ४०.६ कि.ग्रा. | (२.७ × ३) = ८.१ लि. + (१.८ × २) = ३.६ लि. + (०.९ × १६) = १४.४ लि.; एकूण = २६.१ लि. |
| ७. प्रायश्चित्त दिन — गणना २९:७–११ | १ बैल, १ मेंढा, ७ कोकरू + दैनिक २ कोकरू; १ पापबलीचा | ४.२ कि.ग्रा. + २.८ कि.ग्रा. + १२.६ कि.ग्रा.; एकूण = १९.६ कि.ग्रा. | (२.७ × १) = २.७ लि. + (१.८ × १) = १.८ लि. + (०.९ × ७ + ०.९ × २) = ८.१ लि.; एकूण = १५.३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | बकरा | | लि. |
| ८. तंबूचा सण — गणना २९:१२–४० | दिवस १ = १३ बैल … दिवस ७ = ७ बैल; दररोज २ मेंढे आणि १४ कोकरू; एकूण ७० बैल, १४ मेंढे, ११२ कोकरू + दैनिक १४ + शब्बाथ २; ७ पापबलीचे बकरे | २९४ कि.ग्रा. + ३९.२ कि.ग्रा. + १५९.६ कि.ग्रा.; एकूण = ४९२.८ कि.ग्रा. | (२.७ × ७०) = १८९ लि. + (१.८ × १४) = २५.२ लि. + (०.९ × ११४) = १०२.६ लि.; एकूण = ३१६.८ लि. |

दैनंदिन पवित्र आत्म्याच्या देणग्यांपासून ते तंबूवस्तीच्या उत्सवापर्यंत नदी कशी अधिकाधिक खोल होत जाते याचे स्पष्ट चित्र आपल्याला मिळावे म्हणून, आपण पीठ आणि तेल यांच्या प्रमाणाचा विचार करणार आहोत. साप्ताहिक आणि नवीनचंद्राच्या सर्व अर्पणांची यादी आपण येथे देणार नाही; परंतु फक्त दैनंदिन अर्पणापासून ते वर्षाच्या कालदर्शिकेतील अंतिम उत्सवापर्यंतचा क्रम त्यांच्या वाढत्या प्रमाणासह दर्शविणार आहोत.

| अर्पणाचा प्रकार | पीठ | तेल | यहेज्केल ४७:१–७ नदीचे वर्णन |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| दैनिक अर्पण | २.८ कि.ग्रा. | १.८ लि. | पवित्रस्थानातून पाणी बाहेर येताना दिसले |
| शब्बाथ | ५.६ कि.ग्रा. | ३.६ लि. | १,००० हात गेल्यावर पाणी घोट्यांपर्यंत पोहोचले |
| नवीनचंद्र | २३.८ कि.ग्रा. | १५.३ लि. | २,००० हात गेल्यावर पाणी गुडघ्यांपर्यंत पोहोचले |
| बेखमीर भाकरांचा उत्सव | १६९.४ कि.ग्रा. (शब्बाथ अर्पणाच्या ~३० पट) | १०८.९ लि. | ३,००० हात गेल्यावर पाणी कंबरेपर्यंत पोहोचले |
| सातव्या महिन्याचे उत्सव | ५५३ कि.ग्रा. (शब्बाथ अर्पणाच्या ~१०० पट) | ३५९.२ लि. | ४,००० हात गेल्यावर पाणी डोक्यावरून गेले – पूर्ण भरून वाहणारे |

या नदीबद्दल सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे ही नदी जिथे जिथे वाहत गेली तिथे तिथे जीवन आणि आरोग्य घेऊन गेली.

यहेज्केल ४७:९ “ही महानदी जाईल तेथे तेथे तिच्यात जे जीवजंतू भरलेले असतील ते जगतील व तिच्यात मासे विपुल होतील, कारण जेथे जेथे हे पाणी जाईल तेथे तेथे सर्वकाही निरोगी होईल; जेथे जेथे ही नदी जाईल तेथे तेथे सर्व प्राणी जिवंत राहतील.”

शब्बाथ आपल्याला ख्रिस्ताच्या उपस्थितीच्या वाढत्या प्रमाणाचा तत्त्व शिकवतो. आपण हेच तत्त्व इतर नेमणुकांवर लागू केले तर आपण पाहतो की ही नदी अधिकाधिक खोल होत जाते. जसा शब्बाथ हे गुडघ्यापर्यंत पाणी असण्यासारखे आहे, तसेच इस्राएलाच्या याजकांना नदी पूर्णपणे उघडण्याआधी पाण्यात पाऊल ठेवावेच लागले यहोशवा ३:१३. जर तुम्ही शब्बाथाला विश्वासाने स्वीकारले, तर नदीचा उर्वरित प्रवाहही तुमच्यासमोर उघडेल, आणि तुम्ही त्या संपूर्ण प्रवाहातून पार जाऊ शकाल. पीठ आणि तेल एकत्र मिसळून स्वर्गातून उतरलेली ती भाकर तयार होते. जर आपण या भौतिक घटकांपलीकडे पाहून खऱ्या भाकरीला म्हणजे ख्रिस्ताला ओळखले, तर आपण त्या नदीचा वाढता प्रवाह शोधला आहे, जो देवाच्या सिंहासनातून वाहत येतो.

पुन्हा एकदा लक्ष द्या यहेज्केल जेव्हा चार हजार हातांच्या ठिकाणी नदीकाठी परत आला, तेव्हा नदीच्या काठावर सर्वत्र झाडेच झाडे उभी होती.

यहेज्केल ४७:७ "परत येत असता नदीच्या दोन्ही तीरांवर बहुत झाडे असलेली मी पाहिली."

नदी विपुल प्रमाणात पाणी पुरवत होती, जेणेकरून ही झाडे पूर्ण वाढू शकतील आणि त्यापैकी काही तीसपट, काही साठपट, आणि काही शंभरपट फळ देणारी होती (मार्क ४:२०).

हेच जीवनाच्या नदीचे गूढ आहे. जेव्हा आपण परमेश्वराच्या ताजेपणाच्या वेळा आणि ऋतूंना अनुसरतो; परमेश्वराच्या नियमामध्ये चालतो; त्याच्या नियमांचा आणि न्यायांचा स्मरण करतो; तेव्हा आपण विश्वासाने आपली अंतःकरणे उघडतो की आपण पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेल्या झाडांप्रमाणे होऊ.

स्तोत्र १:२–३ "तर परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो, त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करतो, तो धन्य. जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते, जे आपल्या हंगामात फळ देते, ज्याची पाने कोमेजत नाहीत, अशा झाडासारखा तो आहे; आणि जे काही तो हाती घेतो ते सिद्धीस जाते."

या स्थितीचा अर्थ असा की आपली पाने कोमेजणार नाहीत म्हणजे पाप

आपल्यावर प्रभुत्व गाजवणार नाही. स्वर्गातून उतरलेली भाकर म्हणजे ख्रिस्ताचे जीवन आपण पूर्णपणे ग्रहण करू, आणि आपल्या धार्मिकतेसाठीची भूक व तहान पूर्ण होईल. हीच ती कारण आहे का, ज्यामुळे प्रेषित आत्म्याच्या साक्षीमध्ये लोकांना सकाळ-सायंकाळची उपासना करण्यासाठी प्रोत्साहन देत गेले?

“सकाळच्या आणि संध्याकाळच्या बलिदानाची वेळ पवित्र मानली जात असे; आणि ती संपूर्ण यहूदी राष्ट्रात उपासनेची ठरलेली वेळ म्हणून पाळली जाऊ लागली. नंतर जेव्हा यहूदी विविध देशांत बंदिवासात विखुरले गेले, तरीही त्यांनी ठरलेल्या वेळी यरुशलेमकडे तोंड करून इस्राएलाच्या देवापुढे आपली प्रार्थना अर्पण केली. या प्रथेने ख्रिस्ती लोकांना सकाळ-संध्याकाळ प्रार्थनेचे उदाहरण मिळते. देव केवळ औपचारिक विधी उपासनेचा आत्मा नसलेल्या प्रथेचा निषेध करतो; परंतु तो त्याच्यावर प्रेम करणारे लोक, जे सकाळ-संध्याकाळ नम्रतेने आपल्या पापांची क्षमा मागण्यासाठी आणि आवश्यक आशीर्वादांसाठी विनंती करण्यासाठी त्याच्यासमोर येतात त्यांच्याकडे अत्यंत आनंदाने पाहतो.” Patriarchs and Prophets, पृ. ३५३–३५४

जर सकाळ-संध्याकाळ आपल्या वाट्याला जिवंत भाकर येत असेल, तर आपल्या आत्म्यांसाठी ही भाकर जमा करण्यासाठी थांबणे शहाणपणाचे नाही काय? आपण पाहतो की प्रेषितांनी आत्म्याच्या साक्षीमध्ये इस्राएलाच्या सकाळ-संध्याकाळच्या बलिदानांचा उल्लेख आपल्या सकाळ-संध्याकाळ उपासनेशी जोडलेला आहे. रोज उपासनेसाठी ठरलेल्या विशिष्ट वेळांचा उल्लेख याकडे स्पष्ट दाखला देतो की जिवंत भाकर आजही सकाळी आणि संध्याकाळी तशीच खाली येते जशी ती पृथ्वीवरील खऱ्या देवाच्या उपासनेच्या सुरुवातीपासून येत आहे.

जर आपण प्रत्येक सकाळी व प्रत्येक संध्याकाळी जमा होत असू, तसेच प्रत्येक शब्बाथ दिवशी दुप्पट आशीर्वाद मिळवण्यासाठी एकत्र येत असू, तर मग आपण का नाही आणखी ३००० हात पुढे, शब्बाथाच्या प्रवाहाच्या केंद्रात जाऊन इतके जिवंत पाणी ग्रहण करावे की ज्यामुळे आपल्या आत्म्याचा कोरडेपणा रोखला

जाईल आणि पापाला जीवनात प्रकट होण्याची संधी मिळणार नाही? पहा आपल्याला हा इशारा दिला आहे:

यहेज्केल ४७:११ "त्यातील पाणथळे व दलदली ह्यांचे पाणी निर्दोष होणार नाही; ती खारटाणेच राहतील."

दलदल आणि चिखल ही अशी ठिकाणे आहेत जी कधीकाळी नदीच्या प्रवाहात होती, पण आता त्या नदीच्या प्रवाहात नाहीत. काहीजण असे आहेत ज्यांनी पिता आणि पुत्राच्या प्रकाशाचा स्वीकार केला, तरीही मध्यरात्रीच्या हाकेमधील वाढत्या प्रकाशामध्ये पुढे जाण्यास नकार दिला. अशांची स्थिती दलदली व चिखलासारखी होईल जिथे पाणी वाहत नाही आणि जिथे काहीही उगवत नाही जिथे सर्व काही मीठात बदलून जाण्यास सोपवले जाते. त्यामुळे जीवनाच्या प्रवाहात या, आणि आमच्या पित्याच्या नेमणुकांद्वारे मिळणारी जिवंत भाकर ग्रहण करा आणि तुम्ही आशीर्वादित व्हाल.

मोशेच्या व्यवस्थेतील सर्व बलिदाने आणि अर्पणे ख्रिस्ताच्या बलिदानाद्वारे उपलब्ध झालेल्या आत्म्याच्या देणगीकडे निर्देश करत होती. ही बलिदाने फक्त भविष्याकडे बोट दाखवत नव्हती; ती त्या जीवनाच्या नदीकडेही निर्देश करत होती जी त्याच काळात आपल्या पिता आणि प्रभु येशूपासून येणाऱ्या ताजेपणाच्या ऋतूंमधून वाहत होती.

तुम्हाला फक्त गुडघ्यापर्यंत येणारे पाणी मिळवायचे आहे काय? तुम्हाला त्याऐवजी डोक्यावरून वाहणारे विपुल पाणी नाही का हवे जे तुम्हाला पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेल्या झाडाप्रमाणे बनवेल? हे कसे घडते? परमेश्वराच्या नियमावर दिवस-रात्र ध्यान करा, कारण त्यातूनच ताजेपणाचे ऋतू ओळखण्याचे काळ आणि वेळा समजतात. मग या ऋतूंमध्ये तुम्हांला बायबल कसे वाचावे आणि ते आपल्या जीवनात कसे लागू करावे याचे शहाणपण आणि विवेक प्राप्त होईल.

आज अनेकजण असे शिकवतच नाहीत की ख्रिस्ताचा क्रूस त्यांच्याजवळ आहे. जेव्हा असा आग्रह धरला जातो की यहूदी लोकांची बलिदानव्यवस्था फक्त

मोशेच्या काळापासून १५०० वर्षांनी येणाऱ्या ख्रिस्ताच्या दु:खांकडे निर्देश करीत होती, तेव्हा या निष्कर्षापर्यंत पोहोचले जाते की ख्रिस्ताचा क्रूस आता २००० वर्षे मागे राहिला आहे. यामुळे ख्रिस्ताचे आजचे स्वतःला नाकारणे, आजचे त्याचे सहन केलेले अतुलनीय वेदनाभार, आज त्याने उचललेला क्रूस हे सर्व अत्यंत कमी लेखले जाते आणि अनेकदा पूर्णपणे दुर्लक्षित केले जाते. आणि हेच सैतानाला हवे आहे. ए.टी. जोन्स या विषयी असे म्हणतो:

"यहूद्यांची सुरुवातीपासून शेवटपर्यंतची सर्वात मोठी अडचण हीच होती की त्यांनी परमेश्वराला इतके लांब ठेवले की देवाने स्वतःच्या परिपूर्ण जवळीकतेचे सुसंगत उपस्थितीचे चिन्ह म्हणून दिलेल्या गोष्टींनाही त्यांनी त्याच्या लांब असण्याचे संकेत म्हणून वापरले. बलिदाने, अर्पणे, तंबू, मंदिर, त्यातील सेवा या सर्व गोष्टी यहूदी शिक्षक आणि बहुसंख्य लोकांनी अशा प्रकारे वापरल्या की ज्याचा त्यांच्यासाठी एकच अर्थ होता या गोष्टी कुठेतरी दूर असलेल्या ख्रिस्ताकडे निर्देश करतात. त्यांना माहीत होते की या गोष्टी मसीहाकडे निर्देश करतात, पण तो मसीहा 'खूप दूरचा' म्हणून समजला जात होता. आणि मग ते असा विचार करीत की त्यांनी स्वतःच इतके चांगले व्हावे की ते त्याला स्वतःजवळ आणू शकतील; आणि या गोष्टींमध्येच शक्ती आहे, या गोष्टीच धार्मिकता देऊ शकतात असे मानले जात होते.

मला खात्रीने सांगता येत नाही की सातव्या दिवशीचे ऍडवेंटिस्ट त्या जुन्या कल्पनेपासून पूर्णपणे पुढे गेले आहेत की या सर्व गोष्टी दूरच्या ख्रिस्ताचेच चिन्ह होत. मी असे म्हणत नाही की आजच्या ऍडवेंटिस्टा लोकांना ख्रिस्त दूर आहे असे वाटते. परंतु मला भीती वाटते की जेव्हा ते पवित्रस्थानाकडे आणि त्याच्या सेवेकडे बलिदानांकडे व अर्पणांकडे पाहतात, तेव्हा त्यांच्या मनात अजूनही हीच कल्पना असते की या गोष्टी त्यांना 'कुठेतरी खूप दूर असलेल्या' ख्रिस्ताबद्दल शिकवण्यासाठी दिल्या गेल्या. होय, हे खरे आहे की या सर्व गोष्टी ख्रिस्ताकडे निर्देश करतात. पण त्या दूरच्या नव्हे जवळच्या ख्रिस्ताकडे निर्देश करतात. देवाची इच्छा अशी होती की या सर्व गोष्टी लोकांना तेजस्वी, हृदयात वसणाऱ्या, त्यांच्या दैनंदिन अनुभवात उपस्थित असलेल्या ख्रिस्ताकडे निर्देश कराव्यात १८०० वर्षे दूर नाही, स्वर्ग पृथ्वीपासून जितका दूर आहे तितका दूर नाही तर

त्यांच्या रोजच्या जीवनात जिवंत व वर्तमान तारणारा म्हणून त्या असाव्यात. जेव्हा आपण हे सत्य घट्ट पकडतो आणि मग पवित्रस्थान, बलिदाने, अर्पणे थोडक्यात, लेवीयच्या पुस्तकात प्रकट केलेले सुवार्तेचे सत्य अभ्यासतो, तेव्हा आपण पाहू की या सर्व गोष्टी त्यांच्यासाठी दिवसेंदिवस जिवंत, वर्तमान तारणारा ख्रिस्त दर्शवीत होत्या; आणि आपण हेही पाहू की तो आज आपल्या साठीही तसाच आहे."

लेवीयच्या पुस्तकात, अनुवादात, उत्पत्तीत, निर्गमात आणि संपूर्ण बायबलमध्ये आज आपल्या साठी सुवार्ता आहे, ख्रिस्ती अनुभव आहे. पण जेव्हा आपण त्या उताऱ्यांचे वाचन करतो आणि म्हणतो की ती बलिदाने आणि अर्पणे यहूद्यांसाठी कुठेतरी दूर असलेल्या ख्रिस्ताकडे निर्देश करीत होती, आणि यहूद्यांनी त्या सेवांद्वारे दूरवर येणाऱ्या मसीहाकडे पाहावे अशी अपेक्षा होती जर आपण त्या शास्त्रांना अशा प्रकारे पाहतो, तर आपण ती शास्त्रे अगदी यहूद्यांनी जशी पाहिली तशीच पाहत आहोत; आणि आपण त्याच स्थानावर उभे आहोत जिथे ते त्या वेळेस उभे होते.

आणि असे करणे योग्य नाही. नक्कीच नाही. आपण पवित्रस्थानाकडे त्यातील भांडी, सामग्री, देवाची नेमणूक, आणि त्यामध्ये वसणारी देवाची उपस्थिती अशी पाहू नये की यातून त्यांना हे शिकवले जात होते की देव फक्त स्वर्गातील पवित्रस्थानातच वास करतो. जेव्हा आपण असे विचार करतो, तेव्हा आपण तयार होतो हे मानायला की देव आपल्यापासूनही तितकाच दूर आहे जितका तो त्यांच्यासाठी असल्याचे आपण गृहित धरतो; कारण आपण मानतो की तो त्यांच्याजवळ तितकाच आला जितके आपल्याला वाटते. आणि जर आपण त्यांच्या बाबतीत असेच मानत असू, तर आपण तिथे असतो तर आपणही तेच मानले असते हे सिद्ध होते आणि याचा अर्थ असा की आपण त्यांच्या सारखेच वागलो असतो.

आजही आपल्यात ही प्रवृत्ती सहज आढळते की पवित्रस्थान व त्याच्या सेवांचा आणि "तुम्ही माझ्यासाठी एक पवित्रस्थान तयार करा, म्हणजे मी त्यांच्यात वास करीन" या वचनाचा अभ्यास करताना आपण म्हणतो, "होय, देव त्यांच्या

पवित्रस्थानात वास करीत होता; आणि ते स्वर्गातील पवित्रस्थानाकडे निर्देश करीत होते; आणि नवीन पृथ्वीवर देव पुन्हा आपल्या लोकांमध्ये वास करणार आहे, कारण असे लिहिले आहे 'पाहा, देवाचे निवासस्थान मनुष्यांमध्ये आहे, आणि देव त्यांच्याबरोबर वास करील आणि ते त्याचे लोक होतील.'" मग आपण असे म्हणतो की नवीन पृथ्वी आल्यावर देव पुन्हा आपल्या लोकांबरोबर राहणार. पण प्रश्न आहे की देव आत्ता कुठे आहे? हेच आपल्याला जाणून घ्यायचे आहे. देव नवीन पृथ्वीवर आपल्या लोकांबरोबर राहणार आहे याने मला आत्ता काय फायदा? यातील कोणता भाग मला उपयोगी, जर तो आत्ता माझ्याबरोबर वास करीत नसेल? कारण जर तो आत्ता माझ्याबरोबर राहू शकत नसेल, तर तो नवीन पृथ्वीवर किंवा कुठेही माझ्याबरोबर राहू शकणार नाही, कारण त्याला तसा प्रसंगच मिळणार नाही. मला जाणून घ्यायचे आहे आणि प्रत्येक आत्म्याला जाणून घ्यायचे आहे की तो आत्ता माझ्याबरोबर राहतो का? जर आपण त्याला यहूद्यांच्या काळात मागे ढकलून ठेवतो, आणि मग त्याला नवीन पृथ्वीवर पुढे ढकलतो, तर यामुळे आपल्याला आत्ता काय मिळते? त्यामुळे देव आत्ता मनुष्यात कसा प्रकट होतो? अशा विचारांनी तो आत्ता आपल्याबरोबर कसा राहतो? ह्याच प्रश्नाचे सतत अध्ययन करणे आपल्यासाठी गरजेचे आहे.

आता तुम्हाला दिसेल की त्या विधीव्यवस्थेमध्ये फक्त यहूद्यांना थोड्या काळासाठी त्रास देऊन नंतर नाहीशी होणारी एखादी क्षणभंगुर गोष्ट नव्हती त्याहून खूप अधिक गूढ अर्थ त्या व्यवस्थेत दडलेला होता. कारण मानवी स्वभाव आजही आणि सदैव त्या गोष्टीने त्रस्त होत असतो जितक्या निश्चयाने सैतान जगतो, जितक्या निश्चयाने वैरभाव मानवी हृदयात अस्तित्वात आहे. जे मन देवाच्या नियमाला अधीन नाही आणि होऊही शकत नाही जोपर्यंत असे मन जगात आहे, तोपर्यंत जग विधीवादाच्या शापाखाली राहणार आहे. आणि माझ्या हृदयात जर त्याची कणभरही उपस्थिती असेल, तर मी स्वतःही विधीवादाच्या शापात सापडण्याच्या धोक्यात आहे.

आता, ए.टी. जोन्स च्या विचारांमध्ये थोडेसे मी स्वतः येथे जोडतो जे लोक शिकवतात की यहूदी फक्त एका 'विधींच्या फेऱ्यात' अडकले होते, आणि ज्यातून त्यांना मिळणारे तारण त्यांच्यापासून १५०० वर्षे भविष्यकाळात होते ते

प्रत्यक्षात देवाला ‘विधीवादाचा देव’ बनवतात. जर क्रूसापूर्वी देव फक्त विधीवादाचा देव होता, तर हा गुण त्याच्या स्वभावातच कायम राहतो, आणि “जसे आपण पाहतो तसे आपण बनतो” म्हणून लोकही विधीवादी बनतात. म्हणून विवेक बाळगा जे विधीवादाविरुद्ध बोलतात तेच अनेकदा विधीवादाला पाठिंबा देत असतात. आता आपण पुन्हा ए.टी. जोन्स यांच्याकडे वळूया:

“आपले कार्य म्हणजे येशू ख्रिस्तामध्ये अशी मुक्तता शोधणे अशी संपूर्ण विजयी अवस्था की देवाच्या उजव्या हातातील त्या उंच स्थानी आम्हीही ख्रिस्तामध्ये सहभागी होऊ; आणि तो वैरभाव जो आपल्या स्वभावात आहे, तो ख्रिस्तामध्ये पूर्णपणे नष्ट व्हावा. मग आपण विधीवादापासून मुक्त होऊ; मग आपण परंपरा आणि मनुष्यनिर्मित आज्ञांपासून मुक्त होऊ आणि अशा लोकांपासून मुक्त होऊ जे इतरांसाठी त्यांच्या मनाप्रमाणे ‘अंतरात्मा’ तयार करतात. लोक म्हणतात, ‘तुम्ही हे केलेच पाहिजे नाहीतर तुम्ही तारण पावणार नाही,’ ‘तुम्ही ते केलेच पाहिजे नाहीतर तुम्ही तारण पावणार नाही.’ नाही! नाही! येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा नाहीतर तुम्ही तारण पावू शकत नाही. येशू ख्रिस्तावरील खरा विश्वास ठेवला, तरच तुम्ही तारण पावाल.”

